नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

**दिनांक ०१/०९/२०२२ (गुरूवार)**

**(दुपार)**

---

## दरोडा घालण्याचे तयारीत असलेला आरोपी अटक
## स्थानिक गुन्हे शाखेचे पथक नागपूर ग्रामीणची कारवाई

दि. ०१/०९/२०२२ रोजी रात्री ०२.५० वा. दरम्यान स्थानिक गुन्हे शाखेचे पथक नागपूर ग्रामिण हद्दीतील पोस्टे बेला परिसरात पेट्रोलींग करित असतांना मौजा बेला येथील जैतापूर फाटा येथे दोन मोटरसायकलच्या बाजुला पाच इसम संशयीतरित्या हालचाल करतांना दिसुन आले. त्यादरम्यान स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने आपले ताब्यातील वाहन संशयीत इसम यांच्या दिशेने वळविले असता त्यातील समोर उभे असलेले पाचही इसमांनी पळ काढला. पथकाने गाडीतून उतरून त्यांना पकडण्याचा प्रयत्न केला परंतु त्यातील एक इसम मिळून आला. इतर चार इसम अंधाराचा फायदा घेवुन पळून गेले. सदर इसमाला ताब्यात घेवुन विचारपुस केली असता तो उडवाउडवीचे उत्तरे देवु लागला. यामुळे संशय बळावला त्यानंतर सदर संशयीत इसमास विश्वासात घेऊन चौकशी केली असता आपले नाव आकाश उर्फ बाका सतिश साहारे वय ३० वर्ष रा. इंदीरा माता नगर, हेडवे किराणा स्टोर जवळ हिंगणा नागपूर असे सांगीतले. सदर इसमाची अंगझडती घेतली असता त्याच्या जवळ एक स्कुड्राइव्हर व कटर मिळून आल्याने खात्री झाली कि हा गंभीर गुन्हा करण्याच्या बेतात आहे. त्याचे जवळ असलेल्या दोन्ही मोटरसायकलच्या नंबर प्लेटला काळया रंगाची चिकट टेप लावलेली दिसुन आली. तसेच त्यातील काळया व निळया रंगाची पल्सर गाडीवर एक सन्चल एक अनकुचीदार लोखंडी वाकलेली सलाख बांधलेल्या स्थितीत दिसुन आली. सदर दोन्ही मोटरसायकल गाडीच्या नंबर प्लेटला चिकटवलेल्या काळया रंगाच्या चिकट टेप काढुन त्यांचा मोटरसायकल क्रमांक पाहिले असता काळया निळ्या रंगाची बजाज पल्सर मोटरसायकल ज्यावर क्र. एमएच–४०/सीके– ८०४१ काळया व निळया रंगाचा पट्टा असलेले स्प्लेन्डर प्लस एमएच–२७/एई– ८२९१ हे क्रमांक नबर प्लेटवर आढळुन आले. सदर दोन्ही मोटरसायकल हया संशयीत इसम आकाश उर्फ बाका सतिश सहारे याच्या मालकीच्या नाहीत असे त्यांनी सांगीतले. त्यास इथे येण्याचा उद्देश विचारला असता त्याने सांगीतले. कि 'आम्ही सर्व मिळून बेला गावातील ग्रामपंचायत कॉम्प्लेक्स मधील सोन्याचे दुकानात दरोडा टाकून सोन्या–चांदीचे दागिने चोरून नेण्याच्या कट रचला' असे निष्पन्न झाले.

**आरोपी**

नामे १) आकाश उर्फ बाका सतिश सहारे वय ३० वर्ष रा. इंदीरा माता नगर, हेडवे किराना स्टोर जवळ, हिंगणा नागपूर व त्याचे साथीदार के २) फरार आरोपी– करण अर्जुन वाल्मीकी रा. भिमनगर हिंगणा, ३) सागर उर्फ पाजीरा, ओटेघाटरा, एमआयडीसी बोरी, ४) शुभम नावाचा ईसम, ५) क्रमांक २ याचा मित्र नाव माहीत नाही.

**जप्त मुद्देमाल**

आरोपीकडुन १) काळया निळया रंगाची बजाज पल्सर क्रमांक एम.एच– ४०/सीके– ८०४१, २) काळा निळा रंगाचा पट्टा असलेली स्पेलंडर क्रमांक एम.एच २७/एई– ८२९१, ३) एक लोखंडी मोठी सब्बल, ४) एक पिवळी प्लास्टीक मुठ असलेली स्कुडॉयव्हर, ५) एक टोकदार लोखंडी सळाख दोन्ही कडुन वाकलेली व ६) एक लाल रंगाचा मुठ असलेला कटर ताब्यात घेण्यात आले आहे.

सदर प्रकरणी सरतर्फे पोलिस नाईक शंकर किनगे स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण यांचे रिपोर्ट वरुन पो. स्टे. बेला येथे आरोपीतांविरुध्द कलम ३९९, ४०१ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपी क्र. १ ला अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक श्री राहुल ठेंगणे मो.क्रं. ९८२३३६४१४७ हे करीत आहे.

सदरची कार्यवाही नागपुर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. विजयकुमार मगर, अपर पोलीस अधीक्षक श्री. राहुल माकणीकर यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. ओमप्रकाश कोकाटे, पोउपनि भारत थिटे, पोहवा मदन आसतकर, पोहवा नरेंद्र पटले, पोना मयुर ढेकळे, पोना बालाजी साखरे, पोना अजिज शेख चालक पोशि आशुतोष लांजेवार यांचे पथकाने केली.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर